**प्रेसनोट**

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती

दिनांक : २१.०४.२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचेनाव | लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती घटक, अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | श्री. उमेश मनोहराव कडु, वय –४८ वर्षे, पद – लिपीक, (वर्ग–३), किसनराव उभाड विदयालय, बदनापुर, ता. चिखलदरा, जि. अमरावती. |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | २१/०४/२०२५ चे १७/१९ ते १७/२२ वा. चेदरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | ६०००/–रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | ६०००/–रुपये |
| ७ | घटनास्थळ | गांधीगेट ते झुला चौक रोड, बेगमपुरा, अचलपुर. |

**थोडक्यात हकिकत :**

यातील तक्रारदार यांनी दिनांक १६/०४/२०२५ रोजी तक्रार दिली की, तक्रारदार या सेवानिवृत्त शिक्षीका आहे आणि तक्रारदार हया कै.सनराव उभाड विद्यालय,बदनापूर ता.चिखलदरा जि.अमरावती येथुन सहायक शिक्षीका यापदावर सन २००३ ते २०२२. पर्यंत कार्यरत होत्या. तक्रारदार यांचे सहायक शिक्षीका या पदाच्या वेतनाच्या फरकाचे वाढीव अरियस बिल ६९,०२४/– रुपयाचे देयक प्रलंबित होते. तक्रारदार यांचे वरील बिल काढून दिल्याचा मोबदला तसेच इतर प्रलंबित बिल काढुन देण्यासाठी कै.किसनराव उभाड विद्यालय, बदनापूर ता. चिखलदरा जि.अमरावती येथील लिपीक श्री.उमेश कडू हे तक्रारदार यांना अरियस बिल काढून देण्यासाठी एकूण बिलाच्या १० टक्के रक्कम म्हणजे ६९०० रूपये लाच मागत असलेबाबत सविस्तर लेखी तक्रार दिली.

तक्रारदार यांनी दिलेल्या लेखी तक्रारीवरून दिनांक २१/०४/२०२५ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक श्री. उमेश मनोहराव कडु, पद – लिपीक, यांनी तक्रारदार यांना त्यांचे ६९,०२४/– रुपयाचे अरियस बिल काढून दिल्याचा मोबदला तसेच इतर प्रलंबित बिल काढुन देण्यासाठी तडजोडी अंती ६०००/– रू लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शवल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून दिनांक २१/०४/२०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष आरोपी लोकसेवक श्री. उमेश मनोहराव कडु, पद – लिपीक यांनी तक्रारदार यांचेकडुन ६०००/– रुपये लाच रक्कम स्वता: स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे नमुद आरोपी विरुध्द पो.स्टे. अचलपुर, अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री. सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, पो.उपअधि.श्री अभय आष्टेकर यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी, पो.उपअधि.श्री मंगेश मोहोड, पोनि केतन मांजरे, पोलीस अंमलदार युवराज राठोड, राजेश मेटकर, आशिष जांभोळे, विनोद धुळे, स्वाती सरोदे, चालक पोउपनि. सतिश किटुकले, राजेश बहिरट यांनी पार पाडली. नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क: ॲन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती**

**ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५, टोलफ्रिनंबर–१०६४**

(मंगेश मोहोड)

पोलीस उपअधिक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती